'भारतीय स्त्रीवादाच्या विकासातील पंडिता रमाबाई च्या योगदानाचे चिकित्सक अध्ययन'

डॉ. आर.पी.करोडकर, शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली.

प्रस्तावना –

भारतासारख्या सर्वसमावेशक संस्कृतीमध्ये वैदिक काळापासुनच महिला प्रथमपंथामध्ये येण्याच्या प्रयत्न करत आहेत. ऋग्वेदामध्ये लोपामुद्रा, घोषा, सिकता, अपाला, विश्वसा सारख्या विदुषींचा उल्लेख मिळतो. उपनिषदामधील मैत्रेय व गार्गी ने थाज्ञवल्क्यना वादविवादास आव्हान दिल होत. वेद, उपनिषदा बरोबर काव्य व महाकाव्या मध्ये महिला कवींची मुख्य पात्र बनली होती. भवभूतीच्या उत्तर रामचरित्रामध्ये अत्रेयी दि महिला वेदांचा आणि भारतीय तत्वज्ञानाच्या अभ्यास करण्यासंबंधीचा प्रवास माधवाच्या शंकरा दिग्वीजयमध्ये शंकराचार्यांन सोबत वादविवाद करणारी उदया भारती. अर्थशास्त्र प्रकरण 1.21 मध्ये महिलांना सैन्य शिक्षण आणि राजाच्या संरक्षणाची जबाबदारी यामध्ये महिला कारागीर, सुशोभित आणि भटकणाऱ्या स्त्रीयांच्या देखिल समावेश आहे.

त्याचबरोबर समानांतर काळात मनुस्मृती सारख काही संहिता या स्त्रीयांना बालिका अवस्थेत पिता, वैवाहिक अवस्थेत पती व वृध्दा अवस्थेत पुत्र यांच्या संरक्षण किंवा अधिपत्याखाली राहण्याचे सांगत. स्त्रीया आणि शुद्र यांना वेद वाचन्याची अनुमती नाही पण ते पुराण ऐकु शकत. मैत्रेयनी संहितेमध्ये स्त्रीयांना जुगार, मद्यपान व पुरुषांच्या तिसरा मुख्य दोष सांगितले आहे. शतप ब्राम्हणामध्ये पुरुषांची अर्धागिनी म्हटले आहे. सती प्रथेचा लिखित साक्ष एरण अभिलेखात मिळतो. मध्ययुगीन काळात रजिया सुलतान सारख्या पहिल्या महिल्या व शासक बेगम हजरत महला, झाशीची राणी लक्ष्मीबाई प्रथम स्वातंत्र्य लढातील प्रथम महिला क्रांतिकारी सल्तन काळापासुन मुघल काळापर्यंत अनेक राजघराण्यातील महिलांनी अप्रत्यक्ष रित्या शासकांमार्फत राज्यकारभार चालवले किंवा प्रभाव पडला. संत मिराबाई सारख्या भक्ती चळवळीमधील महिलांनी आपले अस्तित्व टिकवुन ठेवले.

पण त्याच बरोबर सती प्रथा, बालविवाह, पर्दाप्रथा, देवदासी, विधवा व कमी वयात विधवा या समस्या व अमानुष प्रथा अस्तित्वात होत्या.

आधुनिक काळात पार्श्चात्य शिक्षणाचा व विचारांचा प्रचार–प्रसार झाला होता. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई कानिटकर, रखमाबाई राउत, रमाबाई रानडे, जनाक्का शिंदे, आनंदीबाई जोशी, फातिमा शेख, ॲनी बेझंट, सरोजिनी नायडु इत्यादी महिला सामाजिक सुधारणेमध्ये वेळोवेळी आपले योगदान देत होत्या.

सामाजिक कुरिती आधुनिक काळात बदलत्या नव्हत्या. वसाहतपुर्व काळातील भारतीय सामाजिक संरचना आणि त्यातली स्त्रीयांची भूमिका पाहता, पाश्चात्य देशापेक्षा भारतातील स्त्रीवादांची मांडणी वेगळी असल्याचे दिसते वसाहतवादाच्या इतिहासामुळे भारतीय स्त्रीची संस्कृती संवर्धक अशी पुनघर्डण हया प्रकारच्या राष्ट्रवादी सिदधांकनाच्या प्रवाह जोरकसपणे पुढे आलेला दिसतो. हि ऐतिहासिक परिस्थिती आणि भारतीय मुल्ये हयामुळे भारतीय स्त्रीयांचे प्रश्न हे पाश्चात्य देशापेक्षा वेगळे असल्याचे दिसते.

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात वरिल समकालिन बुध्दिजीवी व संवेदनशिल महिलांनी तत्कालिन परंपरावादी, पुरुषवादी, पितृसत्तात्मक, सनातनी समाजा विरुध्द बंड पुकारला आणि स्त्री सबलीकरणाच्या वेळोवेळी दिशा ठरवत गेल्या व समाजात महिलांना स्वहकांची जाणिव करुन महिलावादी विचार मांडत गेल्या.

स्त्री–महिलावादी सुधार प्रक्रियेत पुरुष मंडळी सुध्दा अग्रस्थानी होती. राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, रानडे, महर्षी कर्वे, लोकहितवादी, ईश्वरचंद विज्ञासागर, आगरकर, गांधी, भावे, आंबेडकर इत्यादी. यामध्ये ज्योतिबांचे नाव अग्रणी व राममोहन रॉय कृतीशील स्त्रीवादी विचारवंत म्हणुन पुढे आले.

तरीपण पितृसत्तात्मक व्यवस्था, जाती व्यवस्था, धर्म, रुढीवादी, ब्राम्हणवादी, मागासस्थिती, कुटुंब संस्थेव्दारे, शास्त्रांचे चुकिचे अर्थ सांगुन या व्यवस्थेव्दारे महिलांवर नियंत्रण ठेवण्याची तरतूद तत्कालिन मुख्य फळिच्या समाज व्यवस्थेने केली होती व आज ही आहे.

सिंधू संस्कृतीमध्ये मातृदेविची पुजा ते स्त्रीयांची शुद्राती शुद्र स्थिती या काळात महिला समतोल व मुख्य फळीमध्ये येण्याचा प्रयत्न स्त्रीवाद्यांनी वेळोवेळी केला.

वरिल सकारात्मक व नकारात्मक घडामोडी मध्ये स्त्री मात्र व्यवस्थेमध्ये वस्तू म्हणून राहिली. त्या दरम्यान कर्मयोगी पंडिता रमाबाई सारख्या विदुषींचा जन्म झाला व पुरुषवाद आणि महिलावादी समतोल साधण्याचा प्रयत्न केला गेला.

स्त्रीवादी सुधारणा प्रक्रियेमध्ये समाजात बुध्दिवाद्यांन कडुन वेळोवेळी प्रतिक्रिया येत होत्या. त्यामध्ये कृतिशील स्त्रीवादी व अलोकप्रिय स्त्रीवादी पंडिता रमाबाईंचे अध्ययन करण्यात येणार आहे.

व्याप्ती, मर्यादा आणि परिमर्यादा –

प्रस्तुत संशोधन हे पंडिता रमाबाई यांच्या सर्वागिण कार्याचे सखोल व चिकित्सक अध्ययन यांच्या सर्वागिन कार्याची घेण्याबाबत राहिल, त्यामध्ये भारतामधील इतर ही स्त्रीवादी सुधारकांचे, राजकीय विचारवंताचे, साहित्यीकांचे दाखले दिले जातील.

कोणत्याही स्त्रीवादी सुधारकांची तुलना केली जाईल पण पंडिता रमाबाईच श्रेष्ठ आणि इतर दुय्यम ही भूमिका किंवा तुलनात्मक रित्या इतरांना दुय्यम स्थान दिले जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

या संशोधनाची व्याप्ती पंडिता रमाबाई वर लिहीलेल्या साहित्य संदर्भातुन आणि त्यांनी स्वतः लिखित पुस्तकातून राहील.

संशोधनाचा उददेश –

1. स्त्रीसक्षमीकरण विषयक सोयी सुविधांमध्ये किती प्रमाणात सुधार झाला याचा अभ्यास करणे.
2. बलविवाह अगोदर आणि आताची स्थिती मध्ये किती बदल झाला हे अभ्यासने.
3. महिला शिक्षणामध्ये किती प्रमाणात प्रगती झाली याची टक्केवारी शोधने.
4. आरक्षण विषयक पध्दतीमध्ये महिलांना लाभ झाला काय
5. विधवा विवाह प्रोत्साहनामध्ये सरकार व समाजाच्या भूमिका
6. कौशल्य क्षमतेच्या विकासांच्या आढावा घेणे
7. कुटिर उ़द्योगबाबत महिलांची भूमिका
8. संघटनात्मक व चळवळीमध्ये महिलांची भूमिका
9. आर्थिक सबलिकरण झाले कि नाही ते तपासणे.

प्रमुख निष्कर्ष –

भारतीय स्त्रीवाद्याच्या विकासातील पंडिता रमाबाई च्या योगदानाचे चिकित्सक अध्ययन या विषयाच्या अनुषंगाने संशोधनाव्दारे प्राप्त झालेली काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

1. आता प्रमुख सुधारवादी महिलांमध्ये रमाबाई आज ही अलोकप्रिय.
2. रमाबाई रानडे, रमाबाई आंबेडकर, पंडिता रमाबाई या नावामध्ये बरेच नाही तर जास्तीत–जास्त लोकांची गफलत. त्यामुळे सर्व एकच किंवा दोन आहे समजुन दुर्लक्ष.
3. उदारवादी स्त्रीवादापासुन सुरुवात होऊन आता महिलावादी आंदोलन, सामाजिक, आर्थिक, कानूनी समानता, राजनितिक अधिकार, पर्यावरणिय महिलावादा पर्यंत पोहचली आहे.

संदर्भ सुची –

1. पंडिता रमाबाई सरस्वती – प्रबोधनकार ठाकरे
2. महाराष्ट्राचे शिल्पकार पंडिता रमाबाई – सिसिलीया कार्व्हालो
3. पंडिता रमाबाई : धर्मांतर केल्यामुळेच दुर्लक्षित राहिल्या का....... अनुपमा उजगरे
4.
   a) The High Caste hindu women
   b) Pandita Ramabais American Encounter
   c) Pandita Ramabai Through Her own words
   d) A Testimony
   e) स्त्री धर्मनिती

   - Pandita Ramabai

5- Pandita Ramabai : Life and landmark writing – meera kosambi
6- Other Books of meera kosambi on pandita ramabai